# <u>वजन कमी करणे obesity</u>

१. ग्लासभर पाण्यात २ चमचे मध घालून चांगला ढवळून ते पाणी अनुशापोटी घ्यावे.

२. कच्च्या कोबीचे सॅलेड खावे. न्याहारीसाठी पिकलेला टोमॅटो खावा.

३. साखरेशिवाय चहा प्यावा.

४. भाताऐवजी ( दलीया लापशी ) खावा. ( दलीया भाजून १ किलोला -||- किलो भाजलेली मूगडाळ घालून थोडे जिरे घालून एकत्र करून डब्यात ठेवावे )

५. पोळी मध्ये तेल घालू नये.

६. तेल / तूप खाऊ नये. उकडलेल्या भाज्या खावा.

७. सॅलेड जास्त प्रमाणात खावे. ( टोमॅटो , काकडी, बीट वगैरे )

८. स्नान करताना साबणाऐवजी त्रिफळाचूर्ण वापरावे. त्याने मेद कमी होण्यास मदत होते.

९. <u>काय खावे ?</u>
नाचणी, ज्वारीची भाकरी, कुळीथ, मूग, मसूर व त्याच्या डाळी पडवळ, कारले, काकडी, सुरण, मेथी, गवार, सफरचंद, पिकलेली पपई , लाहया, कुरमुरे, खाकरा, उकडलेल्या भाज्या / सूप.

१०. <u>काय खाऊ नये ?</u>
लोणी, चीझ, चॉकलेट, क्रीम, साय, आईस्क्रीम, तळालेले व चमचमीत पदार्थ, वडापाव, भजी, रताळी, बटाटा, साखर ( कमीतकमी ) थंड पेये, उडदाचे पदार्थ ( इडली, वडा, डोसा वगैरे ) भात, मिठाई, थंड पाणी, मीठाचा वापर कमीत कमी. मैद्याचे पदार्थ.

११. वारंवार गरम पाणी पीणे. ( ½ कप )

१२. शक्य असेल तेव्हढा फिरण्याचा व्यायाम करणे. रोज -||- तास.

१३. सूर्यमुद्रा तीसरे बोट वाकवून अंगठयाने धरणे.

१४. त्रिफळाचूर्णाच्या २ गोळया आठवडयातून २ वेळा रात्रीच्या जेवणापूर्वी घेणे.